महाराष्ट्र शासन

क्रमांक : शारिश १०९४/१२९१४/प्र. ९५/क्रीयुसे-३
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १८ ऑगस्ट, १९९४

प्रति,
कुलसचिव,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय :- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून बी.पी.ई. आणि बी.पी.एड. अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी देण्याबाबत.

महोदय,

सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शारीरिक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या व विद्यापीठाकडून शिफारस होऊन प्राप्त झालेल्या सर्व अर्जांचा एकत्रित विचार करुन नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३[ ४ए] [सी][२] अन्वये सन १९९४-९५ पासून पुढील संस्थांना नवीन शारीरिक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्याकरिता व सदर अधिनियमांच्या कलम ४३[५] च्या अनुषंगाने विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| अनु. क्र. | संस्थेचे नांव | शा. शि. महाविद्यालयाचे ठिकाण. |
|---|---|---|
| १. | श्री. शिंदे शिक्षण संस्था, सावरगांव. | सावरगांव, काटोल. |
| २. | लायन्स युद फेडरेशन, नागपूर | वाडी, नागपूर. |
| ३. | अवधूत शिक्षण संस्था, गोंदिया | गोंदिया. |
| ४. | शिलादेवी बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चंद्रपूर. | बल्लारपूर. |
| ५. | महात्मा फुले समता शिक्षण संस्था, नागपूर. | रामटेक |
| ६. | नवजीवन शिक्षण संस्था, मोवाड | मोवाड, जिल्हा नागपूर. |
| ७. | सेवादल शिक्षण संस्था | हिंगणा, नागपूर. |

वरील संस्थांना सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर बी.पी.ई. व बी.पी.एड. हा अभ्यासक्रम सुरु करण्याची पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१] या संस्थांना बी.पी.ई. या तीन वर्षांच्या व बी.पी.एड. या एक वर्षांच्या अभ्यासक्रमाकरिता अनुक्रमे ३० व १०० पर्यंत विद्यार्थी प्रवेश क्षमता राहील.

[कृ.मा.प.]

AK

२] शारीरिक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्यासाठी खालील सुविधा संस्थेकडे असाव्यात :-

अ] प्रशासकीय इमारत [प्राचार्य, प्राध्यापक व कार्यालयासाठी]
ब] व्याख्यान व सांस्कृतिक /मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी सभागृह
क] विषय अध्यापनाकरिता वर्ग खोल्या [तीस विद्यार्थ्यांकरिता एक]
मुलामुलींकरिता स्वतंत्र प्रसाधनगृह व कपडे बदलण्याची खोली.
ड] ग्रंथालय व वाचनालयाकरिता दोन खोल्या.
ई] संशोधन कक्ष, प्रयोगशाळा.
फ] भांडारगृह.
ग] बंदिस्त प्रेक्षागृह.
ह] वैद्यकिय तपासणी व रुग्णांच्या उपचाराकरिता स्वतंत्र कक्ष.

३] वरील सर्व सुविधां ४०० मी. च्या ट्रॅकसह इतर खेळाच्या क्रीडांगणाकरिता किमान दहा एकर जमिन संस्थेच्या मालकीची किंवा दीर्घ मुदतीच्या करारानें घेतलेली असावी. विद्यापीठाने अभ्यासक्रमासाठी मान्य केलेल्या खेळापैकी महाविद्यालयाने निवड केलेल्या खेळाची संबंधित खेळाच्या संघटनेच्या नियमाप्रमाणे प्रमाणित दर्जाची आणि आकाराची क्रीडांगणे त्याचप्रमाणे संबंधित खेळाचें अद्ययावत पुरेसे क्रीडा साहित्य व प्रशिक्षण साहित्य आणि अभ्यासक्रमानुसार इतर साहित्य उपलब्ध असावे. आवश्यक त्या क्रीडा प्रकारासाठी बंदिस्तगृह असावे.

४] संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे तसेच क्रीडा विषयक मासिके, नियतकालिके यांच्यासह विद्यार्थी संख्येच्या आवश्यकतेनुसार ग्रंथालयात असावीत.

५] महाविद्यालयाच्या मान्यतेनंतर तीन वर्षात अ.क्र.[३] मध्ये नमूद केलेल्या संदर्भात खालील सर्व सुविधा निर्माण करणे आवश्यक राहील :-

पहिल्या वर्षात : संस्थेच्या जागेवर ४०० मी. ट्रॅक, प्रशासकीय इमारत, वर्ग खोल्या, मुख्य खेळांची क्रीडांगणे क्रीडा साहित्यासह, ग्रंथालय संदर्भ ग्रंथासह, भांडारगृह, अभ्यासक्रमासाठी लागणारे आवश्यक इतर साहित्य.

दुसऱ्या वर्षात : व्याख्यान व मनोरंजन कार्यक्रमासाठी सभागृह, आधुनिक साहित्यासह, जिम्नॅशियम, वाचन व अभ्यासकक्ष पुरेशा संदर्भ पुस्तकासह.

तिसऱ्या वर्षात : शारीरिक शिक्षण व क्रीडासंबंधी प्रयोगशाळा, संशोधन कक्ष, वैद्यकिय तपासणी व रुग्णांच्या उपचारासाठी स्वतंत्र कक्ष, बंदीस्त प्रेक्षागृह.

६] अ] महाविद्यालयास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर विद्यापीठाच्या मान्यतेने प्रशिक्षित शिक्षक वीस विद्यार्थ्यांस एक या प्रमाणात पूर्ण वेळ [illegible] नियुक्त करणे आवश्यक राहील. याशिवाय प्राचार्य व वैद्यकिय अधिकारी यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करावी लागेल.

ब] महाविद्यालयाने आवश्यक ते प्रशासकीय कर्मचारी नियुक्त करावे. त्यात ग्रंथपालाची नियुक्ती अत्यावश्यक आहे.

देण्यात येईल. तथापि विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीने त्याप्रमाणे शासनाने वेळोवेळी सूचविलेल्या त्रुटींची पूर्तता त्वरित करून वरील सर्व सुविधा निर्माण करणे संस्थेवर बंधनकारक राहील. त्रुटींची पूर्तता व सुविधा निर्माण न केल्यास महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्यात येईल.

८] संस्थेने शारीरिक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व सोयी/सुविधा [ Infrastructural facilities ] ची उपलब्धता अर्थात तातडीने करावी व त्याबाबत संचालक/उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी समाधानकारक असल्याची खातरजमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

९] प्रत्येक संस्थेने संचालक, क्रीडा व युवक सेवा हे ~~८~~ सुचवतील त्याप्रमाणे किमान दोन खेळांवर लक्ष केंद्रीत करून दर्जेदार खेळाडू निर्माण करण्याच्या योजना अंमलात आणणे बंधनकारक राहील.

विद्यार्थी संख्येची अट, आवश्यक सोयी/सुविधांची समाधानकारकरित्या तात्काळ पूर्तता, दर्जेदार खेळाडूंची निर्मिती आणि इतर कोणत्याही अटी व शर्तींचे पालन न केल्यास त्या संस्थेची मान्यता कोणतीही पूर्वसूचना न देता कोणत्याही क्षणी काढून घेण्यात येईल.

३. नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३ [६] अन्वये अंतिम संलग्नीकरणाचा प्रस्ताव विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर नागपूर विद्यापीठ अधिनियम कलम ४३[७] अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार संस्थेची एकूण कार्यपध्दती व प्रगती समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतरच त्या संस्थांचे अंतिम मंजूरीचे शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

[ प्र. ता. गौड ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर अमरावती विभाग, नागपूर.
अध्यक्ष/सचिव, श्री. सिध्दि शिक्षण संस्था, सावरगांव.
अध्यक्ष/सचिव, लायन्स युथ फेडरेशन, नागपूर.
अध्यक्ष/सचिव, अग्रवाल शिक्षण संस्था, गोंदिया.
अध्यक्ष/सचिव, भिलदिवी बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चंद्रपूर.
अध्यक्ष/सचिव, महात्मा फुले समता शिक्षण संस्था, नागपूर.
अध्यक्ष/सचिव, नवजीवन शिक्षण संस्था, मोवाड, नागपूर.
अध्यक्ष/सचिव, सेवादल शिक्षण संस्था, नागपूर.
निवड नस्ती-का. क्रीयुसे-३